सकाळ
सातारा, बुधवार,
२८ जानेवारी २०१५
५

डी. पी. भोसले कॉलेज
ग्रंथालय
कोरेगाव

# थोर स्वातंत्र्यसेनानी, 'रयत'चा आधारवड हरपला



रावसाहेब शिंदे

**सातारा, ता. २७ :** ॲड. रावसाहेब शिंदे यांनी महात्मा गांधींचे विचार कधी सोडले नाहीत. ते स्वातंत्र्यसेनानी होते तसेच ते द्रष्टे विचारवंत होते. रयत शिक्षण संस्थेचे ते थोर आधारस्तंभ होते. त्यांच्या निधनाने संस्थेचा आधारवड हरपला, अशा शब्दांत आज अनेक मान्यवरांनी ॲड. रावसाहेब शिंदे यांच्याविषयी प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

## मान्यवरांची आदरांजली

### अण्णांच्या विचारांचा प्रभाव

**डॉ. अनिल पाटील** (उपकार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था) : कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. ॲड. शिंदे यांनी संस्थेसाठी मोठे योगदान दिले. संस्थेची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ करण्याचा ध्यास त्यांनी घेतला होता. संगणक शिक्षण, विज्ञान परिषद ही त्याची उदाहरणे आहेत. उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी वेगळा ठसा उमटविला आहे. संस्था बदलत्या काळानुसार आधुनिक व्हावी, जे जे उत्तम ते संस्थेत असावे, ही त्यांची धारणा होती.

### गांधीवादी विचारांचे आचरण

डॉ. अशोक भोईटे (प्र. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) : रयत शिक्षण संस्थेचे आधारस्तंभ आणि एक व्रतस्थ व्यक्तिमत्त्व हरपले. ते सतत गांधीवादी विचारांनीच काम करत राहिले. त्यांच्यावर थोर समाजसेवक बाबा आमटे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव होता. रयत शिक्षण संस्थेशी ते अण्णांमुळे जोडले गेले आणि अखेरपर्यंत त्यांनी रयतच्या विकासाचा ध्यास घेतला. ते वारंवार आनंदवनात जात. श्री. आमटे यांच्या कार्याला त्यांनी मदतही केली होती. अखेरपर्यंत त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक कार्याला वाहून घेतले.

### गुणवत्तेस प्राधान्य

**प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर** (सचिव, रयत शिक्षण संस्था ) : आमच्या संस्थेचा एक आधारवड आज हरपला आहे. त्यांनी सतत कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिप्रेत असे कार्य केले आहे. संस्थेतील विद्यार्थ्यांनी मोठे यश मिळवावे, असे कर्मवीरांप्रमाणेच त्यांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी संस्थेतील सर्व शाखांत संगणक शिक्षण सुरू केले. विद्यार्थी गुणवत्तापूर्णच असले पाहिजेत, ही त्यांची धारणा होती. विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टी वाढावी एवढेच नव्हे तर माझी मुले शास्त्रज्ञ व्हावीत, असे त्यांना वाटत होते. त्यामुळे रयत विज्ञान परिषदेची स्थापना करून त्यांनी संस्थेत क्रांतिकारी पाऊल उचलले.

### शांत स्वभाव

प्राचार्य आर. डी. गायकवाड (माजी सचिव, रयत शिक्षण संस्था) : गेली ५० ते ६० वर्षे त्यांचा संस्थेशी संबंध होता. नगर जिल्ह्यात त्यांनी संस्थेसाठी मोठे योगदान दिले आहे. केवळ शाखाच सुरू केल्या नाहीत तर सर्व शाखांना भौतिक सुविधा मिळाव्यात यासाठी ते सतत कार्यरत राहिले. अतिशय शांत स्वभावाचे ते होते. त्यांच्या जाण्याने रयत शिक्षण संस्थेचे मोठे नुकसान झाले आहे.

### आधुनिक शिक्षणाचा ध्यास

**प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड** (माजी सहसचिव, रयत शिक्षण संस्था) : कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ॲड. शिंदे यांना परदेशी जाण्यासाठी शिष्यवृत्ती देऊ केली होती. कर्मवीर भाऊराव पाटील हे त्यांचे दैवत होते. गांधीजींचे विचार आणि कर्मवीरांचा शिक्षणाचा ध्यास ते एकाचवेळी आपल्या हृदयात बाळगत होते. आधुनिक शिक्षणाचा त्यांनी ध्यास घेतला होता. म्हणूनच संस्थेत बीपीओ सेंटर सुरू करून विद्यार्थ्यांना आधुनिक कमवा आणि शिका योजना खुली केली. रयत विज्ञान परिषदेला त्यांनी जागतिक दर्जा मिळवून दिला होता. त्यांच्या जाण्याने संस्थेचे व समाजाचे नुकसान झाले आहे.

### नम्रता आणि व्यासंगाचा संगम

**प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड** (प्राचार्य, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा) : ॲड. रावसाहेब शिंदे हे विद्यार्थ्यांचेच नव्हे तर प्राध्यापक, शिक्षकांचेही मार्गदर्शक होते. विद्यार्थ्यांना आपले दैवत मानले पाहिजे, ही त्यांची धारणा त्यांनी प्राध्यापकांत रुजविली आहे. साधेपणा, नम्रता, व्यासंग आणि वक्तृत्व याचा अनोखा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्यांच्या विचारांनुसार आचरण ही त्यांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे.